# महाराष्ट्र शासन

## नागपूर वनवृत्त, नागपूर

## नागपूर वनवृत्तांतर्गत वृत्तस्तरीय शिपाई व लिपीक-नि-टंकलेखक पदभरती सन २०१४-१५

## सूचना

नागपूर वनवृत्तांतर्गत लिपीक-नि-टंकलेखक या पदाकरिता प्राप्त आवेदन अर्जापैकी स्विकृत झालेल्या ७०० आवेदन अर्जाच्या उमेदवारांची लेखी परिक्षा दिनांक १६/११/२०१४ रोजी घेण्यात आली होती. लेखी परिक्षा दिलेल्या ३६६ उमेदवारांपैकी गुणानुक्रमे ४९ उमेदवारांच्या मुळ दस्ताऐवजांची/प्रमाणपत्रांची तपासणी दिनांक २६/११/२०१४ रोजी वनसभागृह, सेमिनरी हिल्स, नागपूर येथे करण्यात आली आहे. तथापि बोलावण्यात आलेल्या ४९ उमेदवारांच्या यादीमध्ये अनुसुचित जाती प्रवर्गातील खालील नमुद दोन उमेदवारांचे बैठक क्रमांक नमुद करावयाचे अनावधानाने सुटन गेले होते. करिता त्या दोन बैठक क्रमांकाच्या उमेदवारांना वेगळ्याने बोलावून त्यांचे मुळ दस्ताऐवज/प्रमाणपत्र तपासणी करुन घेण्यात येत आहे. तरी, याबाबत सर्व उमेदवारांनी नोंद घ्यावी.

| बैठक क्रमांक | बैठक क्रमांक |
|---|---|
| C-5332 | C-5584 |

तरी, उक्त नमुद बैठक क्रमांकाच्या उमेदवारांनी दिनांक ०१/१२/२०१४ रोजी उपवनसंरक्षक, नागपूर वनविभाग, नागपूर यांचे कार्यालय, शासकीय मुद्रणालयाजवळ, झिरो माईल, सिव्हील लाईन्स, नागपूर येथे कार्यालयीन वेळेत मुळ दस्ताऐवज तपासणीकरिता शैक्षणिक व इतर आवश्यक दस्ताऐवजाच्या मुळ व छायांकीत प्रतीच्या एकासंचासह न चुकता उपस्थित राहावे.

त्याचप्रमाणे दिनांक २६/११/२०१४ रोजीच्या मुळ दस्ताऐवज तपासणी कार्यक्रमात शिपाई व लिपीक-नि-टंकलेखक पदाचे जे उमेदवार गैरहजर होते त्यांना सुध्दा अंतीम संधी देण्यात येत असून त्यांनी सुध्दा दिनांक ०१/१२/२०१४ रोजी उपवनसंरक्षक, नागपूर वनविभाग, नागपूर यांचे कार्यालय, शासकीय मुद्रणालयाजवळ, झिरो माईल, सिव्हील लाईन्स, नागपूर येथे कार्यालयीन वेळेत मुळ दस्ताऐवज तपासणीकरिता शैक्षणिक व इतर आवश्यक दस्ताऐवजाच्या मुळ व छायांकीत प्रतीच्या एकासंचासह व त्यांचे दिनांक २६/११/२०१४ रोजी गैरहजर राहण्याचे कारणासह न चुकता उपस्थित राहावे.

**नोट :-** शिपाई व लिपीक-नि-टंकलेखक पदभरती प्रक्रिया संबंधाने कोणाचा काही आक्षेप असल्यास तो त्यांनी दि.०८/१२/२०१४ पर्यंत उपवनसंरक्षक, नागपूर वनविभाग, नागपूर यांचे कार्यालयाकडे लेखी स्वरुपात सादर करावा, तद्नंतर प्राप्त होणाऱ्या आक्षेपाचा विचार केला जाणार नाही, याबाबत नोंद घ्यावी.

**दिनांक : २९/११/२०१४**

**स्वा/-**
**सदस्य सचिव,**
**वृत्तस्तरीय निवड समिती तथा**
**उपवनसंरक्षक,**
**नागपूर वनविभाग, नागपूर**